








डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
२५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net


Sankalpaa Graphics Ph.: 24357117

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–९)

## बाळराजे टाऽऽटाऽऽ



प्रकाशकः

डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

किंमत रू.

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# बाळराजे, टा ऽ टा ऽऽ

कल्पना परकीय

एक होता राजा आणि एक होती राणी. त्यांना होता एक मुलगा. त्याचं नांव होतं विजय पण सगळे त्याला 'बाळराजे' च म्हणायचे.

आधीच राजाचा मुलगा, त्यातून एकटाच. मग काय विचारता? आईवडील, नोकरचाकर सगळे नुसते मागेपुढे झुलत असायचे. बाळराजांनी काही मागायचीच खोटी की सारा राजवाडा नुसता उलथापालथा व्हायचा. बाळराजांनी काही मागितलं की ते त्यांच्यासमोर हजर करेपर्यंत कुण्णाकुण्णाला म्हणून चैन पडत नसे.

बाळराजांचे असे लाड होत होते हे खरं पण तशीच त्यांना बंधनंही खूप होती. इकडे जायचे नाही, तिकडे बघायचे नाही, हे खायचं नाही की ते प्यायचं नाही, असंच सगळं ! बाळराजांना खूप वाटायचं आपण झाडावर चढावं, पतंगापाठीमागे पळत पळत दूर दूर

जावं, सवंगडी जमवावे नी क्रिकेट खेळावं, नदीत डुंबावं, चिंचा पाडाव्या, पेरू खावे, अगदी रस्त्यावरून टण टण आवाज करीत जाणा-या गाडीवरचा लाल गुलाबी बर्फाचा गोळा देखील खावा. पण ह्यातलं काही देखील बाळराजांना करता यायचं नाही. "झाडावर चढायचं आहे? छे छे पडाल ना" आईसाहेब म्हणायच्या, "क्रिकेट खेळायचं आहे? वेडे की काय? कुठे लागलं म्हणजे?"

असेच दिवस चालले होते. बाळराजे हळू हळू मोठे होत होते. पण नुसते शरीरानेच बरं का. समज आणि वागणं म्हणाल तर अजून लहान मुलांसारखंच. पण त्याला बाळराजे तरी काय करणार? कुठे जायचं नाही की यायचं नाही, शाळादेखील घरच्या घरीच. गुरूजी यायचे, शिकवायचे आणि जायचे.

मग बाळराजे खोलीत बसून आपला आपलाच जीव रमवायचे. बाळराजांच्या खोलीच्या खिडकीवर दरवर्षी एक चिमणी आपलं घरटं बांधायची.




चिमणी घरटं बांधायला लागली ना की मात्र बाळराजांचा सगळा वेळ ती कशी घरटं बांधते, तिची पिलं कशी अंडयातून बाहेर येतात, ती त्यांना भरवते कसं, मोठं कसं करते, हेच बघण्यात जायचा. खूप मजा यायची.

यंदा पण तसंच झालं. पावसाळा संपला, थंडीची सुरवात झाली आणि एक दिवशी सकाळी बाळराजे खिडकीबाहेर डोकावून बघतात तो काय आली की चिऊताई तोंडात काडी धरून घरटं बांधायला.



मग काय दिवसभर बाळराजांचा एकच चाळा किती झालं घरटं, किती झालं घरटं? गुरूजी आले. अभ्यासाला सुरवात झाली पण बाळराजे काय एका जागी बसतात थोडेच? दर दोन मिनीटांनी ऊठायचे आणि खिडकी बाहेर बघायचे. "बाळराजे, एकसारखे खिडकी बाहेर बघू नका. चिमण्या घाबरतील आणि उडून जातील" गुरूजी म्हणाले. "नाही नाही, मला नाही घाबरत त्या. मी अगदी हळूच बघतो. त्यांना कळतसुध्दा नाही."



बाळराजे असं म्हणाले खरं पण खरंच




चिमण्या उडून गेल्या तर असं वाटून मनातून थोडे घाबरले देखील.

काडी काडी करत चिमण्यांनी घरटं पुरं केलं. त्यात अंडीही घातली आणि एक दिवस त्या अंडयातून पिल्लंदेखील बाहेर आली. मग काय गुरूजी आल्यावर बाळराजांनी जाहीरच करून टाकलं, "आज अभ्यासबिभ्यास नाही. आता पिल्लं मोठी होईपर्यंत अभ्यासाला सुट्टी !"

बाळराजांची मर्जी. त्यापुढे गुरूजी काय करणार? आतां बाळराजांचा एकच उद्योग, चिमणी काय करते ते बघत रहायचं.चिमणी उडून बाहेर गेली की थोडावेळ पिल्लांची चिवचिव थांबायची. पण चोचीत दाणा घेऊन जवळ आली की मात्र पिल्लांची एकच धावपळ. छोटया छोटया चोची उघडून चिवचिव आवाज करीत आईच्या तोंडातून घास घेण्यासाठी सगळयांची धडपड, ती गडबड, तो गोंधळ, तो आवाज, त्या इवल्या इवल्या चोची, सगळं बघताना फारफार

मजा यायची.

पिल्लं हळू हळू मोठी होत चालली. पिल्लांकडे बघून बाळराजांना खूप वाटायचं जरा एक पिलू उचलून बघावं, हळूच हात फिरवावा त्याच्या अंगावरून, कसं असेल त्याचं अंग ? मऊ मऊ, कापसासारखं? शेवटी एक दिवस न राहून बाळराजांनी चिमणीला विचारलंच, "चिऊताई, एक पिल्लू मला देतेस का? मला फार आवडतं. तूं काळजी करूं नकोस. मी अगदी छान संभाळीन त्याला."





"बाळराजे, तुम्ही चिमणीचं पिल्लू पाळणार ? लोकं हसतील ना तुम्हाला. तुम्ही एवढे मोठे राजे. तुम्ही सिंह किंवा हत्ती पाळायचे, चिमणी नाही."

चिमणीचं बोलणं ऐकून बाळराजे विचारात पडले. चिमणी म्हणते ते बरोबर आहे. आपण सिंह किंवा हत्तीच पाळायला पाहिजे. सिंहाची आणि हत्तीची पिल्लंसुध्दा अशी गोडच दिसत असतील. त्यांनी चिमणीला विचारलं, "असं म्हणतेस? पण चिऊताई, सिंह किंवा हत्तीची पिल्लं कुठे मिळतात गं ?"

"बरं का बाळराजे, सिंह आणि हत्ती जंगलात राहतात" चिमणी म्हणाली.

"जंगलात? कुठे आहे हे जंगल?" बाळराजांनी विचारलं.

"इथे उन्हाळा सुरू झाला की आम्ही परत आमच्या घरी जातो ना, तेव्हां वाटेत लागतं आम्हाला जंगल" चिमणी म्हणाली.

झालं, बाळराजांनी ठरवलं जंगलात जायचं. कसं आणि कधी ते मात्र त्यांना कळेना. इकडे चिमणीची पिल्लं मोठी झाली. त्यांना पंख फुटले. हळूं हळूं ती उडूं लागली.

उन्हाळा सुरू झाला. चिमणीची इथून उडून परत आपल्या ठिकाणी जाण्याची वेळ जवळ आली. आतां मात्र बाळराजांना धीर निघेना. त्यांनी ठरवलं आपण चिऊताईबरोबरच जायचं. ती दाखवेल आपल्याला जंगल.

"चिऊताई, मी तुझ्याबरोबर येणार. मला जंगलात घेऊन जा" बाळराजे म्हणाले.

"पण बाळराजे, तुम्ही अजून लहान आहात. जंगलात नोकर-चाकर कोणी नसणार. कोण बघेल तुम्हाला?" चिमणी म्हणाली.

"लहान कुठला? मी आता चांगला मोठा झालो आहे. माझी काळजी मी घेईन" बाळराजे म्हणाले.

"पण तुम्हाला उडता कसं येणार ?" चिमणीने



विचारले.

"माझ्याजवळ एक युक्ती आहे. मी एक जाळं आणणार आणि त्याची करणार एक झोळी. मी त्याच्यात बसेन. तूं आणि तुझ्या सगळया मित्रमैत्रिणी मिळून त्या झोळीची टोकं तोंडात धरा आणि मला घेऊन जा, सोप्पं" बाळराजे म्हणाले.

हा बेत ऐकून चिमणीनं मनातल्या मनात डोक्याला हात लावला. आतां काय करणार? दोन दिवसांनी पुनः बाळराजांनी चिमणीला बोलावलं.



"चिऊताई, हे बघ जाळं, आहे की नाही हलकं आणि छान. हे बघ मी ह्याच्यात असं

बसणार आ।ण तुम्ही मला असं उचला” बाळराजे म्हणाले.

“बाळराजे, जंगल फार दूर आहे.पोहचता पोहचता खूप दिवस लागतात. वाटेत तुम्हाला भूक लागेल, मग काय कराल?” चिमणी म्हणाली.

“एवढंच ना, मी फराळाचं घेईन ना बरोबर” असं म्हणत बाळराजांनी स्वयंपाक्याला हुकूम सोडला, “माझ्यासाठी फराळाचे डबे भरा. लाडू, करंज्या, शेव, चकल्या,...” असं करत करत यादी वाढतच गेली आणि डबे भरभरून फराळाचे सामान झोळीत भरले गेले. बाळराजांना वाटले, झाली तयारी.

ते चिऊताईला म्हणाले, “चल निघूया”. “बाळराजे, आकाशात उंच गेलं ना की खूप थंडी वाजते” चिमणी म्हणाली. “असं का ? माझ्या हे लक्षातच आलं नाही. पण हरकत नाही. मी खूप खूप कपडे घालून स्वतःला लपेटून घेतो आणि शिवाय एक हीटर सुध्दा




बरोबर घेतो. मग तर झालं?” झालं बाळराजांचा हुकूम सुटला. दोन दोन तीन तीन स्वेटर, कानटोपी, पायमोजे, हातमोजे, आणि काय काय. बाळराजांनी स्वतःला गरम कपडयात अगदी लपेटून घेतले. आता काय बिशाद आहे थंडी वाजण्याची. शिवाय बरोबर हिटर देखील आहेच. सगळी तयारी झाली.

इकडे चिमणी आणखीनच काळजीत पडली. “बाळराजे, वाटेत समुद्र लागतो, माहित आहे नं तुम्हाला ?”

“काहीं हरकत नाही. आपण त्याचीही तयारी करू.”

पुन्हा धावपळ, एक लहान बोट, एक स्विमिंग सूट, पाण्यात पडलं तर तरंगता यावं आणि बुडू नये म्हणून अंगात घालण्याचं हवा भरलेलं एक जाकीट, पोहायला शिकतांना वापरतो तशी एक टायरटयूब, ज्याला जे सुचेल ते त्याने झोळीत भरले.



"रोज रोज खाली समुद्र आणि वर आकाश बघून बघून कंटाळा येतो....." पण चिमणीचं वाक्य पुरं होण्याच्या आतच बाळराजांनी हुकूम सोडला, "एक टि. व्ही. आणि काही पुस्तकं घाला ह्याच्यात." आतां मात्र झोळी पूर्ण भरली.

इतकी भरली, इतकी भरली की बाळराजांना बसायला देखील जागा उरली नाही. तसेच बिचारे बसले दाटीवाटीत. उडायची तयारी झाली. आता उडणार तोच बाहेर पावसाची सुरवात झाली.

"कोण आहे रे तिकडे, एक छत्री आणा




लवकर" बाळराजांचा हुकूम सुटला. छत्री आली.

चिमणीला काय करावे ते सुचेना. ती म्हणाली, "बाळराजे, माझ्या मैत्रीणी येतीलच आता. पण एवढयाशा खिडकीतून आम्ही कसं नेणार तुम्हाला बाहेर ? तुम्ही जरा गच्चीत जाऊन बसा. आम्ही येतोच."

सगळे नोकर जमा झाले. त्यांनी दोन्ही बाजूला धरून झोळी उचलली आणि निघाली मंडळी गच्चीवर जायला. गच्चीवर पाऊस लागेल म्हणून बाळराजांनी छत्री उघडून डोक्यावर धरली. बाळराजांना झोळीसकट धरून गच्चीवर न्यायचं म्हणजे काही सोप काम नव्हतं. पण तरीही सगळयांनी मिळून बाळराजांना गच्चीवर आणलंच. मंडळी गच्चीवर पोहोचली आणि मोठ्ठा वारा आला. छत्रीत वारा भरला आणि छत्री उडाली. छत्री धरायला म्हणून बाळराजे पुढे वाकले तर त्यांनी हातानं धरून ठेवलेला टि. व्ही. कलंडला

आणि एकदम खालीच पडला. पाठोपाठ फराळाचे डबेही गडगडले.




"अरे, अरे, पकडा पकडा, सावकाश काचा बोचतील पायात जरा जपून....." असा एकच गोंधळ झाला. बाळराजेही गडबडीने खाली उतरले. जे जे जमेल ते गोळा करायला लागले.



तितक्यात चिमण्यांचा थवा येऊन पोहोचलादेखील ! चिऊताई म्हणाली, "बाळराजे, हे काय ? चला चला लवकर."

काय करावं ते बाळराजांना सुचेना. "थांब थांब, आलोच, होईल आत्ताच" म्हणता म्हणता उशीर होऊ लागला.



चिऊताई म्हणाली, "बाळराजे आता आम्हाला गेलचं पाहिजे. जोराचा पाऊस आला आणि सोसाटयाचा वारा सुटला तर मग आम्ही उडूच शकणार नाही. त्या बघा माझ्या मैत्रिणी, निघाल्यासुध्दा" म्हणत म्हणत चिऊताईनेही पंख

पसरले आणि आकाशात झेप घेतली.

बाळराजे अगदी रडकुंडीला आले. पण करणार काय ? उडणा-या चिऊताईला हात हालवून त्यांनी निरोप दिला, "चिऊताई, पुढल्या वर्षी लवकर ये बरं का. आणि येतांना सिहांचं आणि हत्तीचं अंड आणायला विसरू नकोस." बाळराजांचे शब्द ऐकून चिऊताईला हसूं आलं आणि बाळराजांसाठी वाईटही वाटलं. चिऊताई परत फिरली, अगदी बाळराजांच्या खांद्यावरच बसली आणि म्हणाली, "हो, मी तर येईनच, अगदी नक्की येईन आणि मिळालं ना तर सिहांचं आणि हत्तीचं अंडही आणिन तुमच्यासाठी. तोपर्यंत टा ऽऽ टा ऽ"

टा ऽऽ टा म्हणून चिऊताई परत आकाशात उडाली. ती दिसेनाशी होईपर्यंत बाळराजेही तिला टा ऽऽ टा करीत राहीले. पण जातां जातां चिऊताई गालातल्या गालात हसत का होती हे मात्र त्यांना काहीं केल्या उलगडेना.

लेखनः रजनी परांजपे



# आमची पुस्तके

अ-गट
- पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग-२ (आकार)
- पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग-४ (उकार)
- पुस्तकमाला भाग-५ (एकार)
- पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव - २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना